सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४
Helpline No. १८००२२२०१९

Email ID directoriayruralhousing@gmail.com
Web link : https://mahaawaas.org

---

जा.क्र. राज्य योजना/तक्रार अर्ज/९१३/२०२३ — दिनांक : २८.०६.२०२३

प्रति,

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड

विषय : **घरकुल योजने संदर्भात प्राप्त तक्रारी / निवेदने.
पंचायत समिती अंबाजोगाई अंतर्गत रमाई आवास व प्रधानमंत्रर आवास योजनेतील गरीब लाभार्थ्यांकडून पैसे घेऊन घरकुलाचे हप्ते काढत असून संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करुन फौजदारी गुन्हे दाखल करुन निलंबित करणेबाबत.**

संदर्भ : **अवर सचिव, ग्रामविकास विभाग, यांचेकडील पत्र क्र. प्रआयो-२०२३/प्र.क्र.०२/यो-१०, दि. ०८.०६.२०२३**

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये श्री. बापूसाहेब उदारे, जिल्हाध्यक्ष, दलित महासंघ, अंबाजोगाई, जि. बीड यांचेकडील निवेदन या कार्यालयास प्राप्त झाले असून सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. कृपया अवलोकन व्हावे.

तरी, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ अर्जदारास परस्पर कळविण्यात यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

MTakale
**(मंजिरी टकले)**
**उपसंचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

प्रत : मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना माहितीसाठी.

E:\SUREKHA\Takrar\Takrar.docx

जय भिम ! हमारा राज वही स्वराज जय भारत !

# दलित महासंघ

संस्थापक अध्यक्ष मा. प्रा. डॉ. मच्छिंद्रजी सकटे साहेब

जिल्हा अध्यक्ष मा. बापुसाहेब उदारे

संपर्क कार्यालय : अंबाजोगाई - ४३१५१७, जि.बीड, Cell. 9511202225 / 8390217017

जा.क्र. जा.क्र./मंत्री ग्रा.वि.व पं.राज/वै.शि/क्री.व युवक कल्याण/जनरल/२४४२/२०२३ दि. 08 / 02 / 2023

प्रति,
मा. ना. एकनाथरावजी शिंदे साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई-32.

ग्रा.वि. व प.रा. वि (नों.शा.) कार्यासन : ग्रा-१० दिनांक : २८/२/२३ नस्ती क्र : ५८८० उपसचिव (ग्रा.वि.) उपसचिव कार्यवाहीसाठी (स्वीय सहाय्यक)

ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**विषय : पंचायत समिती अंबाजोगाई अंतर्गत रमाई आवास व प्रधानमंत्री आवास योजनेतील गरीब लाभार्थ्याकडून पैसे घेवून घरकुलाचे हप्ते काढत असून पैसे न देणाऱ्या लाभार्थ्यांना जाणिवपूर्वक प्रलबीत ठेवत असणाऱ्या संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करुन फौजदारी गुन्हे दाखल करुन निलंबीत करणे बाबत.**

ग्रा/जनरा १० १०/३/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयी विनंतीपुर्वक आपल्या सेवेत निवेदन सादर करण्यात येते की, अंबाजोगाई तालुक्यात जवळपास शंभर (100) गावाचा कारभार चालतो. ग्रामीण भागातील गरीब व हातावर पोट असलेले विविध योजनेतील लाभार्थी व नागरिक ज्यांचे हातावर पोट आहेत, गरीब व गरजु आहेत असे आपल्या कार्यालयात कोणत्या ना कोणत्या किंवा योजनेच्या लाभानिमित्त पंचायत समितीमध्ये येतात. हातातील काम सोडून त्यांना लहानशा कामासाठी पुर्ण दिवस खर्च करावा लागतो. त्यातच घरकुल विभागातील कर्मचारी त्यांची हप्ता काढण्याच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा पैसे घेऊनच हप्ते काढु अशी पिळवणुक करतात व जर कोणी वरिष्ठाकडे तक्रार केली तर खोटपणाने द्वेषभावनेने त्यांच्या घरकुलाचे हप्ते कोणत्या ना कोणत्या कारणाने टाळण्याचे प्रयत्न करतात. हा प्रकार सर्रासपणे बऱ्याच वर्षापासुन चालू आहे. माझी आपणास विनंती आहे की घरकुल विभागातील सर्व कर्मचाऱ्यावर कायदेशीर चौकशी करुन कारवाई करावी व घरकुलाचे हप्ते काढण्याची प्रक्रिया बदलून पुर्णपणे आपल्यामार्फत हप्ते काढण्यात यावे.

अधिकाऱ्यांच्या मर्जीतले लोकांना काही असे घरकुल आहेत ते कागदावरच आहेत. त्याचे पुर्ण हप्ते उचलण्यात आलेले आहे. असे तालुक्यातील भरपुर घरकुले आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आलेला आहे. पंचायत समितीमधील विस्तार अधिकारी राहुल सरवदे हा मुळ अंबाजोगाई चनई येथील रहिवासी असून तो गोरगरिब ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अरेरावीची भाषा करतो, धमकावतो, मी प्रॉपर आहे जा तुम्हाला काय करायचे ते करा, माझ्या नियमाप्रमाणे मी करीन नसता गुंड

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 1086-2
आवक दिनांक - 20-06-2023
शाखा - S.S. / PMMS
सहाय्यक संचालक (लेखा) उपसंचालक 3 संचालक

लावून मारायची भाषा करतो. या कारणामुळे तालुक्यातील गोरगरिब लाभार्थी भितीपोटी त्यांना मिळणाऱ्या हप्त्यापासून वंचित आहे. तसेच हप्ता काढावयाचा असेल तर गोरगरिब लाभार्थी राहुल सरवदे व घरकुल विभागातील इतर कर्मचारी यांना पैसे दिले जाते.

घरकुल मिळण्याच्या कामासाठी प्रत्येक गावात संघर्ष असतो. ग्रामपंचायतला निवडुन आलेले सर्व सदस्य व सरपंच आपल्या मनमानी पणाने खरे लाभार्थ्यांना डावलून धनदांडगे व पक्या घरावाले लोकांकडून आर्थिक देवाणघेवाण करुन अशाच लोकांचे नावे पंचायत समितीला देतात व त्यानंतर त्यांचा भ्रष्टाचाराचा प्रवास सुरु होतो. व पंचायत समितीचे अधिकारी व घरकुल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची आर्थिक लुट करुन दिनदुबळ्या लोकांना दिवसाढवळ्या लुट करतात. हे कित्येक वर्षापासुन असेच चालू आहे. हे कधी थांबणार व गोरगरीब, कष्टकरी, बेघर लोकांना न्याय कधी मिळणार ?

पंचायत समितीपेक्षा **घरकुल विभागातील कर्मचारी राहुल सरवदे, विस्तार अधिकारी घरकुल विभाग** हा माणुस सतत पैशाची मागणी करतो व पैसे न देणाऱ्या लाभार्थ्यांचा प्रस्ताव त्रुटीमध्ये टाकतो, त्रुटी भरुन काढण्यासाठी वेगवेगळ्या वरिल अधिकाऱ्यांना पैसे देवुन प्रस्ताव मंजुर करतो असे सांगुन पैशाची मागणी करतो. व ग्रामीण भागातील गरीब जनतेला दादागिरीची भाषा वापरतो. तरी या अधिकाऱ्याची उच्चस्तरीय समिती नेमुन खातेनिहाय चौकशी करुन त्याच्यावर फौजदारी कारवाई करण्यात यावी. व **सोबतच असलेले कर्मचारी गिरी, राख, गंडले, देशमुख इ. कर्मचारी मिळुन** हा गोरखधंदा करत आहेत. व अशा कर्मचाऱ्यांच्या आशिर्वादाने तालुक्यातील काही गावात घरकुल फक्त कागदपत्रावरच असून घरकुल बांधताच पुर्ण पैसे वाटप केलेले आहेत. त्यांच्या आर्थिक संबंधातुन काही त्याच्या जवळचे दलाल जे की त्यांना घरकुलाचे हप्ते काढण्यासाठी पैसे गोळा करुन देतात. व घरकुल पाहणी करुन हप्ता काढण्याच्या बहाण्याने त्यांना बोलवुन हप्ता लगेच काढतो इतके पैसे द्यावे लागतील असे जवळच्याच हॉटेलमध्ये बोलवतात व गोरगरीब नाविलाजाने पैसे देतात. व गेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये यांनी त्यांच्याकडे हप्ते काढण्यासाठी असलेल्या गावात जाऊन एका विशिष्ट पॅनलला मतदान करा आम्ही तुम्हाला घरकुलाचा लाभ देऊ असा प्रचार केला आहे. तरी वरील कर्मचाऱ्यावर कडक कार्यवाही करुन गरीब जनतेला न्याय द्यावा.

रमाई आवास योजनेतील रु. 18000/- जे की रोजगार हमी योजनेअंतर्गत वितरीत होतात ते अद्यापपर्यंत एकाही लाभार्थ्याचे संपूर्ण पैसे वितरीत केलेले नसल्यामुळे गोरगरीब लोक दोन वर्ष सतत पंचायत समितीला चकरा मारुन थकुन जातात. तर काही लोकांनी हे पैसे सोडून दिलेले आहेत. याला सर्वस्वी जबाबदार रोजगार हमी योजनेचे कर्मचारी जबाबदार असुन त्यांच्या कडक कार्यवाही करुन त्यांना निलंबीत करण्यात यावे.

हे सर्व प्रकरण गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबाजोगाई यांनी रमाई आवास योजना व पंतप्रधान घरकुल आवास योजना यांच्या हप्त्याचा विषय आपल्या अख्त्यारित ठेवावा व जे लाभार्थी आहेत त्यांचा व गटविकास अधिकारी यांचा थेट संपर्क असावा. कर्मचाऱ्यांचा व लाभार्थ्यांचा संपर्क होवू नये. जे घरकुलाच्या हप्त्याची मागणी असेल ती गटविकास अधिकारी यांच्याकडून संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्याकडे जावी. जेणे करुन गोरगरीब लोकांना त्यांच्या हक्काचे पैसे तात्काळ

मिळण्यास मदत होईल. व भ्रष्टाचार थांबेल. व त्यांना अधिकारी जे पैशाची मागणी करतात ते आपल्या निर्णयामुळे बंद होईल.

जे लाभार्थी घरकुलासाठी पात्र आहेत त्यांचा पंचायत समितीमार्फत सर्वे केला जातो. व ते पात्र असुनसुध्दा पंचायत समितीमधील कर्मचारी त्यांचे नावे काढुन दुसऱ्याच इतर लोकांना पैसे घेवून घरकुल वाटप करतात. त्यामुळे जे खरे लाभार्थी आहेत ते घरकुलापासून वंचित आहेत. आज सुध्दा गावात असे काही लोक आहेत जे आजही पत्र्याच्या पडक्या घरात राहतात व खिंडारात, मातीच्या घरात, छपराच्या घरात जीवन जगत आहेत. अशा लोकापर्यंत आपली घरकुल योजना पोहचलेली नाही. याचे कारण फक्त पंचायत समितीमधील घरकुल विभागाचे कर्मचारीच आहे.

घरकुलासाठी 120000/- मंजुर केले जाते. अधिकारी हे लाभार्थ्यास प्रत्येक हप्त्यास 3 ते 5 हजाराची मागणी करतात. एक हप्ता काढण्यासाठी त्यांना 10 वेळेस काम सोडून अंबाजोगाईस यावे लागते. जर पाच हप्त्याचे रु. 25 हजार हे अधिकाऱ्यांना द्यावे लागते. त्यातच वीट, सिमेंट, गज, मजुरी वाढली असुन या रकमेमध्ये गोरगरीबांनी घर कसे बांधावा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

तरी आपणास विनंती करण्यात येते की, वरील प्रकरणी भ्रष्टाचार थांबवण्यासाठी आपल्यामार्फत संबंधित पंचायत समितीस आदेशित करण्यात यावे. तसेच फक्त कागदावरच घरकुल दाखवुन संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे त्यांची चौकशी करुन त्यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे. अन्यथा दलित महासंघातर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

निवेदक,

बापूसाहेब उदारे
जिल्हाध्यक्ष, दलित महासंघ

**प्रतिलीपी :**

1. मा. ना. गिरीष महाजन, ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई.
2. मा. ना. अतुल सावे, पालक मंत्री, बीड
2. मा. आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद
3. मा. जिल्हाधिकारी, कार्यालय, बीड
4. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड
5. मा. अप्पर जिल्हाधिकारी, कार्यालय, अंबाजोगाई
6. मा. उपविभागीय अधिकारी, उपविभाग, अंबाजोगाई
7. मा. तहसीलदार, कार्यालय, अंबाजोगाई
8. मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई.